मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : **गणेश पाटील** (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १३० ■ बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




## संक्षिप्त...

### कऱ्हाडमध्ये काँग्रेसला झटका ; बडे नेते भाजपात

**कऱ्हाड : हॅलो प्रभात**

कऱ्हाड उत्तर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या कोपर्डे हवेली जिल्हा परिषद गटाला भाजपने खिंडार पाडले आहे. येथील काँग्रेसच्या कट्टर समर्थकांनी मंत्री जयकुमार गोरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार अतुल भोसले, धैर्यशील कदम, रामकृष्ण वेताळ यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

### डॉ.दाभोलकर हत्याप्रकरण कळसकरचे शिक्षेस आव्हान

**मुंबई : हॅलो प्रभात**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अंनिस) कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी दोषसिद्ध आरोपी शरद कळसकरला ठोठावण्यात आलेल्या शिक्षेला कळसकरने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आपल्याविरोधात प्रथमदर्शनी पुरावे नसल्याचे सांगून जामीन देण्याची मागणी त्याने न्यायालयात केली आहे.

### ‘बविआ’ च्या कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**

वसई- विरार मधील बहुजन विकास आघाडीचे अनेक वर्षे नगरसेवक राहिलेले महेश पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत केले.

# लोकशाही संपवण्याचे भाजपाचे षडयंत्र !

## रमेश चेन्नीथला ; लोकशाही वाचविण्यासाठी काँग्रेसचा लढा

**पुणे : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पक्ष देशातील लोकशाही व संविधान संपवण्याचे काम करत आहे. निवडणूक आयोगाच्या मदतीने मतचोरी केली जात आहे.

महाराष्ट्र, हरियाणा, कर्नाटकातील मतचोरी राहुल गांधी यांनी उघड केली आहे. लोकशाही व संविधान आज धोक्यात असून ते वाचवण्यासाठी राहुल गांधी संघर्ष करत आहेत, ही लढाई मोठी व कठीण आहे. पण आपण सर्वजण राहुलजींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून हा लढा जिंकू असे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले.

काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला. यावेळी प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, देश कठीण परिस्थितीतून जात आहे. शेजारी देशांशी आपले चांगले संबंध नाहीत, अमेरिका भारताला धमकी देत आहे पण पंतप्रधान त्यावर काहीच बोलत नाहीत. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना अमेरिकाच काय कोणत्याही देशाने भारताला धमकी देण्याचे धाडस केले नाही.



राहुल गांधी चीनबद्दल काही बोलले तर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश त्यावर टिप्पणी करतात.

आता न्यायालय देशप्रेमी कोण हे ठरवणार का, असा प्रश्न त्यांनी विचारला. महाराष्ट्रातील भाजपाचे सरकार सर्वात भ्रष्ट असून कृषी मंत्री विधानसभेत रमी खेळतो, तर गृहराज्यमंत्री डान्सबार चालवतात असे चेन्नीथला म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांचा समाचार घेत चेन्नीथला म्हणाले की, राहुल गांधी यांनी प्रश्न निवडणूक आयोगाला विचारले त्यावर आयोगाने उत्तर दिले पाहिजे पण फडणवीस उत्तर का देत आहेत.

फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत का निवडणूक आयुक्त? असे चेन्नीथला म्हणाले.

# अखेर पृथ्वीराज पाटलांच्या हातात ‘कमळ’

## काँग्रेस अध्यक्षपदाचा दिला राजीनामा ; आज होणार भाजप प्रवेश

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली मध्ये दोन वेळा विधानसभेचे उमेदवार राहिलेले आणि काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. ते मंगळवारी या निर्णयाची अधिकृत घोषणा करणार असल्याचे ठरले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी मुंबईत भाजप पक्षात प्रवेश करणार असलेल्या पृथ्वीराज पाटील यांनी आज काँग्रेस शहर जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. सोबतच पक्षाच्या सदस्यत्वाचाही राजीनामा प्रदेशाध्यक्षांना पाठवला.काँग्रेसने सहकारमहर्षी गुलाबराव पाटील यांच्यापासून आजपर्यंत विविध पातळ्यांवर दिलेली साथ आणि संधीबाबत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. पृथ्वीराज पाटील यांच्या भाजप प्रवेशावर



सोमवारी रात्री शिक्कामोर्तब झाले. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांच्या घरी स्नेहभोजन केले आणि त्याचवेळी भविष्यातील योजना आणि संधींबाबत चर्चा झाली. त्याआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी ‘सांगली फर्स्ट’ याबाबत त्यांनी आपली मते मांडली होती. त्याला बळ देण्याची ग्वाही त्यांनी दिल्यानंतर प्रवेश निश्चित झाला असून बुधवारी दुपारी तीन वाजता मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्तेच त्यांचा पक्षप्रवेश होत आहे. भाजपमध्ये प्रवेश करण्यापूर्वी पाटील यांनी काँग्रेसमधील पदाचा राजीनामा दिल आहे.

दरम्यान, मी काल काँग्रेसमध्ये होतो, उद्या भाजपमध्ये असेन, माझ्यासाठी सांगलीचे हित हे सर्वप्रथम असेल. काँग्रेसने मला संधी दिल्या, साथ दिली. मी या पक्षाचा ऋणी आहे. मी राजकारण, समाजकारण काँग्रेसमध्येच शिकलो. विकासाला गती देण्यासाठी भाजपात जाण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात मला त्यात यश येईल. काही लोक माझ्यासोबत येऊ शकणार नाहीत, मात्र विकासाच्या प्रक्रियेत मी त्यांच्या पाठीशी उभा असेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### अखेर शिक्कामोर्तब

काँग्रेसचे शहराध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी अखेर हातात कमळ घेऊन भाजपामध्ये प्रवेश केला आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पृथ्वीराज पाटील यांच्या निवासस्थानी भेट देऊन स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी पक्षप्रवेश बाबत चर्चा झाली प्रवेश करणार असल्याच्या बातमीवर शिक्कामोर्तब झाले.

# ‘सांगली पॅटर्न’ मधून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणार : जिल्हाधिकारी काकडे

**सांगली : हॅलो प्रभात**



सांगली जिल्ह्याचा वार्षिक जीडीपी सध्या ६७ हजार कोटी असून तो आपल्याला १ लाख ७७ हजार कोटी रूपयांवर नेण्यासाठी प्रयत्न करावयाचा आहे. त्यासाठी बाहेरचा पैसा आपल्या जिल्ह्यात येणे अपेक्षि आहे. जपान, जर्मनीप्रमाणे आपल्याला आपल्या जिल्ह्यावर लक्ष केंद्रित करण्याचे तंत्र अवलंबून सांगली जिल्हा समृध्द करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. सांगली पॅटर्न ब्रँड तयार करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणार, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आज येथे केले. सांगली पॅटर्न कृषि परिषद निर्यात सक्षमीकरण – फळबागेतून समृध्दीकडे कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित या कार्यशाळेस संचालक मंडळ अपेडाचे सदस्य परशुराम पाटील, प्रकल्प संचालक मॅग्नेट विनायक कोकरे, कोल्हापूर विभाग कृषि सहसंचालक बसवराज मास्तोळी, सरव्यवस्थापक (पणन) कोल्हापूर सुभाष घुले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार, सहाय्यक व्यवस्थापक अपेडा पांडुरंग बामणे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक नंदिनी घाणेकर, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक विद्या कुलकर्णी, एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकारी वसुंधरा बिरजे आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



## संपादकीय

# ध्वजसंहितेचे पालन करूनच तिरंगा फडकवावा

**या**वर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे. या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे. १३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी. घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी. तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान. १५ ऑगस्ट नंतर तिरंगा ध्वज व्यवस्थित घडी घालून सन्मानपूर्वक ठेवावा. ध्वज संहितेच्या नियमांचे पालन करून प्रत्येकाने आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा व घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करावा.

# जगात दरवर्षी ३ हजार हृदयांचे होते प्रत्यारोपण

**वै**द्यकीय क्षेत्रामध्ये 'चमत्कार ठरलेला' अवयवदान दिन जागतिक स्तरावर १३ ऑगस्ट १९६७ पासून साजरा केला जातो. या चळवळीचे हे ५७ वे वर्ष आहे तर भारतात १९८० नंतर ही चळवळ सुरु झाली आणि १९९४ साली दिल्लीच्या एम्स हॉस्पिटलमध्ये भारतात सर्वप्रथम हृदयाचे प्रत्यारोपण झाल्याने या चळवळीला ३० वर्षे पूर्ण होत असून आता शासनाच्या पुढाकाराने या मोहिमेला बळ मिळू लागले आहे. जनतेमध्येही जाणीवजागृती वाढीस लागली आहे. जगामध्ये दरवर्षाला सर्वसाधारणत: ३ हजार हृदयांचे प्रत्यारोपण होते. ही चळवळ म्हणजे समाजाला मिळालेले वरदान असल्याची भावना हृदय शल्यविशारद डॉ. विजय अंधारे यांनी जागतिक अवयवदान दिनानिमित्त व्यक्त केली आहे.

१३ ऑगस्ट हा अवयवदान दिन १९९४ पासून भारतातही साजरा होऊ लागला आहे. अवयवदान ही एक काळाची गरज आहे. किडनी, डोळे, यकृत या अवयवदानाबरोबरच आजकाल हृदय अवयवदानाची चळवळ वेग घेत आहे. १९६७ साली साऊथ आफ्रिकेमध्ये ख्रिश्चन बर्नाड यांनी एका मनुष्यामधील हृदय दुसऱ्या मनुष्यामध्ये प्रत्यारोपित केले. १९८० साली हृदय प्रत्यारोपण झाल्यानंतर शरीर त्याला नाकारू नये म्हणून औषधांचा शोध लागला आणि त्यानंतर या चळवळीने वेग पकडला. भारतामध्ये डॉ. वेणुगोपाल यांनी पहिले हृदय प्रत्यारोपण दिल्ली येथे एम्स हॉस्पिटलमध्ये १९९४ साली केले. हृदय प्रत्यारोपण झालेले ५० टक्के रुग्ण १० वर्षे व्यवस्थित जगू शकतात. ज्या रुग्णांचे हृदय निकामी झाले आहे, हृदयाचे काम ३५% पेक्षा कमी आहे आणि पेशंटचा रक्तदाब कितीही औषधे दिली, उपाययोजना केल्या तरी वाढत नाही त्यावेळी हृदय प्रत्यारोपणाचा पर्याय विचारात घेतला जाऊ शकतो, असे हृदयमित्र अंधारे यांनी स्पष्ट केले. अवयवदान दिनाच्या निमित्ताने मृत्यूशी कवटाळणाऱ्या आणि ब्रेनडेड झालेल्या रुग्णांच्या नातलगांनी मृत्यूनंतरही आपल्या आप्ताचे अवयव कोणाच्यातरी कामी यावेत ही भावना वाढीस लागावी, अशी अपेक्षा वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केली. याशिवाय अवयवदान केलेल्या रुग्णाच्या वारसाबद्दल ठोस असे कृतिशील धोरण अवलंबावे, अशीही अपेक्षा यानिमित्ताने सुजाण नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### हृदय प्रत्यारोपणाचे निकष...

हृदय अवयव मिळणे एकूणच कठीण असल्यामुळे हृदय प्रत्यारोपण करताना एखाद्या रुग्णाचा मेंदू मृत (ब्रेन डेड) झाला असेल आणि तो बरे होण्याची काही शक्यता नसेल, त्यांच्या नातेवाईकांनी संमती दिली तरच हृदयासह अन्य अवयवांचे प्रत्यारोपण करता येते. रुग्णांचे हृदय प्रथम तपासले जाते. हृदयाचे काम ४५ टक्क्यांपेक्षा जास्त आवश्यक आहे. हृदय देणारा आणि स्वीकारणाऱ्या दोघांचा रक्तगट आणि शरीराचे आकारमान मिळतेजुळते असणे गरजेचे आहे. रक्तदाब व्यवस्थित असेल आणि अवयवदात्याला कोणताही जंतूसंसर्ग नसेल तर त्याच्या अवयवदानाचे प्रत्यारोपण करता येत असल्याचे डॉ. विजय अंधारे (हृदयशल्यविशारद) यांनी सांगितले. अवयवदान हे एक वरदान आहे. वैद्यकीय क्षेत्रात हा चमत्कार म्हणावा लागेल. यामुळे अवयव प्रत्यारोपणानंतर हृदयरुग्णाला ३०-




३२ वर्षे आयुष्य मिळू शकते. अवयवदानाबद्दल अलीकडच्या काळात जागरुकता वाढते आहे. जनतेमधूनही सकारात्मक सूर भावना निर्माण होत आहे. ती आणखी व्यापक स्वरुपात वाढावी.

**ध्यानं परं कृतयुगे त्रेतयां ज्ञानमुच्यते ।**
**दवापरे यज्ञमेवाहू: दानमेव कलौयुगे ।।**

कृत युगात ध्यान, त्रेता युगात ज्ञान, द्वापार युगात यज्ञ आणि कलयुगात दान हे साधन असल्याचा उल्लेख कुर्म पुराणात आढळतो. कलयुगात दानाला महत्व दिले असल्याने भुदान, गोदान, संपत्तीचे दान, अन्नदान, वस्त्रदान या स्वरूपाचे दान केल्याचे आढळून येते. पौराणिक कथांमध्ये दधिची ऋषींनी वृत्तसुराला मारण्यासाठी आपल्या अस्थींचे इंद्राला दान दिले होते, शिबी राजाने कबुतराचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या अंगावरचे मांस दान दिले तर कर्णाने जन्मत:च शरीराचा एक भाग म्हणून लाभलेले कवच कुंडल दान केले. यावरूनच भारतीय संस्कृतीत दानाचे महत्व व पुराण काळापासूनच अवयव दानाची संकल्पना रूढ असल्याचे लक्षात येते.

सर्वच माध्यमातून अवयवदान करण्याबाबत जनजागृती होत असून दिवसेंदिवस अवयवदानाच्या मोहिमेला समाजातून प्रतिसाद मिळत आहे परंतू तो प्रत्यक्षात अंमलात आणणाऱ्यांची संख्या त्यामानाने कमी आहे. अवयवदान करणाऱ्या व्यक्तिंपेक्षा गरजू व्यक्तिंची यादी मोठी आहे. त्यामुळे अवयवदान करण्यासाठी प्रत्येकाने आपला सहभाग नोंदविणे आश्यक आहे.

**वैद्यकिय क्षेत्रामध्ये झालेल्या 'प्रगती'मुळे अवयवदान करण्याची प्रक्रिया काही प्रमाणात सोपी झाली आहे. अवयवदान हे दोन प्रकारे करता येते.**

**१) जिवंतपणी करता येणारे अवयव दान.**
**२) मरणोत्तर करण्यात येणारे अवयव दान.**




जिवंतपणी अवयवदान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक प्रत्यारोपण समन्वयक केंद्र या अधिकृत संस्थेची परवानगी असते. अवयवदानानंतर दात्याच्या प्रकृतीवर दुष्परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच ही परवानगी दिली जाते. त्यामुळे जिवंतपणी किडनी व यकृताचे काही प्रमाणात दान करता येते. तसेच रक्त हे देखील मानवी शरीराचा अविभाज्य भाग आहे. मानवी शरीराचे संतुलन राखण्यासाठी रक्ताची निर्मिती होत असते. त्यामुळे ठराविक कालावधीमध्ये रक्तदान करणे हे आरोग्यासाठी चांगले असल्याचे सांगण्यात येते. मृत्यूनंतर अवयवदान करण्यासाठी मृत्यू कोणत्या कारणाने झाला हे तपासले जाते. त्याअंतर्गत हृदय बंद पडून होणारा मृत्यू जसे वृद्धापकाळाने किंवा नैसर्गिक मृत्यू असतो. नैसर्गिक मृत्यूनंतर आपण फक्त नेत्रदान, त्वचादान आणि हृदयाच्या झडपा दान करू शकतो. मेंदू बंद पडून होणारा मृत्यू म्हणजे ज्याला ईीरळप ऊशरींह संबोधले जाते. यामध्ये मेंदूला इजा झाल्याने माणसाचा मृत्यू होतो. अशा मृत्यूमध्ये माणसाचा फक्त मेंदू मृत पावलेला असला तरीही हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस हे सर्व अवयव चालू स्थितीत असल्याने त्यांचे दान करता येते. मेंदूमृत व्यक्ती आणि कोमामध्ये गेलेली व्यक्ती यामध्ये बराचसा फरक आहे. कोमामध्ये असलेल्या व्यक्तिच्या मेंदूचे कार्य चालू असते आणि त्यामुळे कोमामध्ये गेलेली व्यक्ती शुद्धीवर येण्याची शक्यता असते. परंतु मेंदूमृत झालेली व्यक्ती कधीही परत जिवंत होऊ शकत नाही. म्हणून मेंदूमृत व्यक्ती मृत्युसमयी दवाखान्यात आयसीयुमध्ये असेल व मृत्यूपूर्वी अवयवदान करण्याचे संबंधित व्यक्तीने जाहीर केले असेल तरच अवयवदान करता येऊ शकते. असे करण्यासाठी कमीत कमी चार डॉक्टरांच्या समितीने त्या व्यक्तीची तपासणी करून त्यास मेंदूमृत घोषित करणे कायद्याने बंधनकारक आहे. मृत्यूनंतर नेत्र, मेंदू, हृदय, त्वचा अशा विविध अवयवांचे दान करून एक व्यक्ति दोन-तीन व्यक्तींच्या रूपाने जिवंत राहू शकते. श्रीलंकेसारखा छोटासा देश नेत्र निर्यातीत जगात पहिल्या स्थानावर आहे. अनेक देशात मृत व्यक्तीने मरण्याआधी आपले अवयवदान करू नये, असे स्पष्ट जाहीर केले असेल तरच त्या व्यक्तीचे अवयवदान केले जात नाही. अन्यथा प्रत्येक व्यक्तीची अवयवदानाला मान्यता आहे, असे मानून त्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात येते. अवयवदानाविषयी सर्वस्तरावर जनजागृती करणे आवश्यक झाले आहे. अवयवदान व देहदान या दोन्हीमध्ये फरक आहे. अवयवदान हे जिवंतपणी आणि मरणानंतरही करता येते. मृत्यूपश्चात करण्यात येणाऱ्या अवयवदानानंतर मृत शरीर हे नातेवाईकांच्या ताब्यात देताना ते व्यवस्थित प्रक्रिया करून दिले जाते. ज्यामुळे एखादा अवयव काढून घेतल्याच्या कोणत्याही खुणा दर्शनी भागावर दिसून येत नसल्यामुळे अवयवदान केल्यानंतर धार्मिक विधी करण्यासाठी अडचण येत नाही. अवयवदान करताना शरीरातील ठराविक अवयवच दान केले जातात. परंतू देहदान हे फक्त मरणानंतरच एखाद्या वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टरांना मानवी शरीराचा अभ्यास, प्रात्यक्षिक व संशोधन करण्यासाठी दिले जाते. देहादानानंतर असे मृत शरीर धार्मिक विधीसाठी नातेवाईकांकडे दिले जात नाही तर ते फक्त संशोधनासाठीच वापरले जाते. कोणत्याही स्वरूपाचे दान असो ते गरजू व्यक्तींना केले तर त्याला अधिक महत्व प्राप्त होते. आपल्याकडील संपत्ती ही गरजूंना दान केल्यास ईश्वरभाव प्राप्त होतो, असे म्हणतात. त्याअनुषंगाने नाशवंत मानवी शरीर मातीत विलीन करण्यापेक्षा आपली देहरूपी संपत्ती मरणोत्तर दान केली तर अनेकांचे प्राण वाचविल्याचे पुण्य प्राप्त होईल.

## प्रसार भारती आणि एईएक्स स्पोर्ट यांच्यात धोरणात्मक भागीदारी

**मुंबई : हॅलो प्रभात**



भारताच्या क्रीडा मनोरंजन क्षेत्रात परिवर्तन घडविणारे एक महत्त्वाचे पाऊल उचलत राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारक- प्रसार भारतीने एईएक्स स्पोर्ट या युके स्थित आदिग्रुपच्या स्पोर्ट्स इनोव्हेशन शाखेसोबत ग्लोबल लीग रेसलिंग (जीएलडब्ल्यू)च्या प्रसारणासाठी एक धोरणात्मक सामंजस्य करार केला आहे. जीएलडब्ल्यू हा भारत आणि आशिया-पॅसिफिक प्रदेशात होणारा या प्रकारचा पहिला व्यावसायिक रेसलिंग लीग आहे. या अनोख्या सहयोगामुळे भारत आणि आशिया-पॅसिफिक तसेच जागतिक प्रेक्षकांसाठी जागतिक दर्जाच्या क्रीडा मनोरंजनाची निर्मिती करण्यासाठी प्रसार भारतीची टेलिव्हिजन, रेडियो आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून असलेली व्यापक राष्ट्रीय पोहोच आणि एईएक्स स्पोर्ट चे जागतिक ब्रँडिंग, कंटेंट, निर्मिती, आयपी आणि मार्केटिंगचे नैपुण्य यांचा सुमेळ साधला आहे. १७ सप्टेंबर २०२५ रोजी जीएलडब्ल्यूची अधिकृत सुरुवात होणार असून त्याच्या प्रसारणाची सुरुवात ४ ऑक्टोबर रोजी होईल. जीएलडब्ल्यूचे प्रसारण डीडी स्पोर्ट्सवरून करण्यात येईल तसेच प्रसार भारतीचा डिजिटल प्लॅटफॉर्म वेव्ह्ज आणि एअरवर त्याचे स्ट्रीमिंग होईल. जीएलडब्ल्यू चा हा कुटुंबांना गुंतवून ठेवणारा पहिला सीझन ४० आठवडे चालणार आहे.

## गुंतवणूकदारांसाठी 'फायनान्शिअल फ्रीडम सेशन'चे आयोजन

**पुणे : हॅलो प्रभात**



आर्थिक सक्षमीकरणाच्या उद्देशाने, हॅलो मार्केट वेल्थ मॅनेजमेंट सर्व्हिसेसचे संस्थापक कबीर भूपेशराज यांनी हॉटेल ऑरोरा टॉवर्स, पुणे येथे फायनान्शिअल फ्रीडम सेशन चे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये ५० हून अधिक गुंतवणूकदारांनी सहभाग नोंदवला. या सत्रात कबीर भूपेशराज यांच्यासोबत सह-संस्थापक हॅलो मार्केट वेल्थ मॅनेजमेंट सर्व्हिसेसचे जैद अन्सारी देखील उपस्थित होते. दोघांनी मिळून गुंतवणूकदारांना म्युच्युअल फंड, एसआयपी आणि एसडब्लूपी यांची सविस्तर माहिती दिली. तसेच गोल-बेस्ड इन्व्हेस्टिंग कसे गुंतवणूकदारांना त्यांचे आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करते, हे समजावून सांगितले.

## पटेल रिटेलचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव १९ ऑगस्टला उघडणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

PATEL RETAIL LIMITED
TRUST & TOGETHERNESS

पटेल रिटेल लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १० रु. दर्शनीमूल्याच्या इक्विटी शेअरसाठी २३७रु. ते २५५रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ किंवा ऑफर) दि.१९ ऑगस्ट २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ५८ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ५८ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. हा आयपीओ ८५,२०,००० पर्यंतच्या शेअर्सच्या नवीन इश्यू आणि १०,०२,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्स प्रमोटर्स सेलिंग शेअरहोल्डर्सचे मिश्रण आहे. या ऑफरमध्ये पात्र कर्मचाऱ्यांकडून सबस्क्रिप्शन आरक्षण देखील समाविष्ट आहे.

## मेगा मेडिकल कॅम्पचे आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

वंचित समाजघटकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने देबाब्रता ऑरो फाउंडेशनतर्फे गोरेगाव आरे कॉलनीतील युनिट १३ येथे मेगा मेडिकल कॅम्प आयोजित करण्यात आला. या उपक्रमात द इस्थेटिक क्लिनिक्स, किया केअर फाउंडेशन आणि ॲजिलस डायग्नोस्टिक्स यांनी सहकार्य केले. कॅम्पमधून स्थानिक रहिवाशांना मोफत वैद्यकीय सल्ला, औषधांचे वितरण आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. २०० हून अधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. कॅम्पचा एक विशेष भाग म्हणजे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ॲक्ने, एक्झिमा, बुरशीजन्य संसर्ग अशा आजारांचे निदान करून तत्काळ मोफत औषधे देण्यात आली. याशिवाय किया केअर फाउंडेशनच्या टीमकडून तोंडाच्या कर्करोगाची तपासणी व दंतचिकित्सा सेवा पुरवण्यात आल्या.

## कृषिभूषण दादासाहेब ठिगळे यांच्या स्मरणार्थ व्याख्यानाचे आयोजन

**सांगली : हॅलो प्रभात**

राज ग्रामीण विकास प्रतिष्ठान सांगलीच्या वतीने कृषीभूषण दादासाहेब ठिगळे यांच्या स्मरणार्थ अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांचे ' साहित्य, समाज आणि संवेदना' या विषयावर व्याख्यान शनिवार दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता रोटरी हॉल,गणेशनगर स्विमिंग टॅंक शेजारी,सांगली येथे आयोजित केले आहे. सदरच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.तारा भवाळकर भुषवणार आहेत. या प्रसंगी प्रा.मिलिंद जोशी यांची अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जेष्ट समीक्षक प्रा.अविनाश सप्रे यांच्या स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी या समीक्षा ग्रंथास मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आणि लेखक आणि संपादक महेश कराडकर यांना महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा विशेष ग्रंथकार पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात येणारआहे.

या खास व्याख्यानासाठी व सत्कार सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन राज ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.संजय ठिगळे, उपाध्यक्ष राजेश ठिगळे, विश्वस्त एस.एस.पैलवान व कार्यवाह सौ.सुवर्णा ठिगळे यांनी केले आहे.


## ८ महिन्यांच्या बालकावर किडनी स्टोनची शस्त्रक्रिया

**पुणे : हॅलो प्रभात**

पुण्यातील केवळ आठ महिन्यांच्या बाळाच्या दोन्ही मूत्रपिंडात खडे असूनही यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. इतक्या लहान वयात असा आजार होणे जवळजवळ अशक्य मानले जाते. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्राचे लक्ष वेधून घेतले आहे. श्रीयांश नावाचे बालक मे २०२५ मध्ये सूर्या हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. त्याला ताप, पोटदुखीचा त्रास होता, शिवाय मूत्राला लालसर रंग आणि लघवीचे प्रमाण कमी होणे अशी लक्षणे जाणवत होती. सुमारे पंधरवड्यापासून मूत्रमार्गातील संसर्ग असल्याचा संशय घेऊन बाह्यरुग्ण विभागातून उपचार सुरू होते. तरीही प्रकृती झपाट्याने खालावत होती. त्याची तपासणी केली असता, असे आढळले की दोन्ही मूत्रपिंडात खडे असून ते मूत्र प्रवाह अडवत आहेत. त्यामुळे मूत्रपिंडात दुखापत झाली होती. बालरुग्णाला तत्काळ बाल अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. बाल मूत्ररोगतज्ज्ञ डॉ. अखिल माने आणि बाल नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. मधुरा फडणीस खरदकर यांच्या नेतृत्वाखाली बहुवैद्यकीय तज्ज्ञांच्या पथकाने त्याच्यावर उपचार केले.

## 'आदिशेष' चित्रपटाचे शूटिंग पूर्ण

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**



राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक रमेश मोरे नेहमीच आपल्या मातीतील, सर्वसाम न्यांच्या जिव्हाळ्याचे, मनाला भिडणारे आणि मनोरंजनातून प्रबोधन करणारे विषय आपल्या चित्रपटांद्वारे प्रेक्षकांसमोर सादर करीत असतात. मागील बऱ्याच दिवसांपासून ते आपल्या आगामी मराठी चित्रपटाच्या कामात बिझी आहेत. सध्या ते 'आदिशेष' या आगामी मराठी चित्रपटावर काम करीत आहेत.

'आदिशेष' हे चित्रपटाचे शीर्षक उत्कंठावर्धक असून, त्यात मांडलेला विषय आजवर कधीही समोर आलेला नाही. या चित्रपटाचे शूटिंग नुकतेच पूर्ण झाले आहे.

## 'अनंतराव पवार'च्या ४२ विद्यार्थ्यांची क्यू स्पायडरमध्ये प्रशिक्षणासाठी निवड

**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालय व क्यू स्पायडर प्रा. ली. कंपनीच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट साठी आवश्यक कौशल्य विकसित व्हावी यासाठी ट्रेनिंग निवड प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये महाविद्यालयातील २४० विद्यार्थ्यांनी ट्रेनिंगसाठी रजिस्ट्रेशन केले.

या ट्रेनिंग प्रोग्रामसाठीची निवड प्रक्रिया ग्रुप डिस्कशन, ॲप्टीट्यूड टेस्ट, संभाषण कौशल्य, तांत्रिक कौशल्य अशा विविध टप्प्यातून पार पडली. उद्योग क्षेत्राच्या मागणी नुसार विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक तांत्रिक कौशल्य आत्मसात करावी यासाठी महाविद्यालयाकडून अशा ट्रेनिंग प्रोग्राम चे वारंवार आयोजन करण्यात येते. क्यूस्पायडर प्रा. ली.च्या माध्यमातून सीएसआर फंडातून ४२ विद्यार्थ्यांची या विनाशुल्क सहा महिन्याच्या ट्रेनिंगसाठी निवड करण्यात आली अशी माहिती क्यू स्पायडर च्या एच आर के. हेमा व महाविद्यालयाचे ट्रेनिंग अॅड प्लेसमेंट अधिकारी प्रा. दिगंबर पवार यांनी दिली. या ट्रेनिंग प्रोग्राम निवड कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनिल ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली ट्रेनिंग अॅड प्लेसमेंट अधिकारी प्रा. दिगंबर पवार यांनी केले.

सदर ट्रेनिंग प्रोग्रामसाठी प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे, ट्रेनिंग अॅड प्लेसमेंट अधिकारी प्रा. दिगंबर पवार, क्यू स्पायडर च्या एच.आर के हेमा, सर्व विभागप्रमुख सर्व विभागाचे ट्रेनिंग अॅड प्लेसमेंट समन्वयक व विद्यार्थी बहुसंख्येने हजर होते. महाविद्यालयाने या प्रोग्राम चे आयोजन केल्याबद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक
हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क :** ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायक्षेत्र)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



# संमिश्र

## 'विवेकानंद'च्या बालकल्याण संकुलात रक्षाबंधन उत्सव



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या ज्युनिअर व सिनिअर एनएसएस विभागामार्फत मंगळवार पेठ येथील बालकल्याण संकुलात रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात एनएसएसमधील विद्यार्थिनींनी संकुलातील मुलांना राख्या बांधून व पेढा भरवून भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक असणारा रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.आर. बागडे, डॉ.अभिजीत पाटील, प्रा.सौ.शुभांगी पाटील आणि प्रा. सौ.एम. के.पोवार उपस्थित होते. कार्यक्रमात ५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.हा उपक्रम विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री.धनवडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## दिव्यांग्याच्या उन्नतीसाठी सामाजिक संस्थांचे योगदान दिशादर्शक : राघवेंद्र आणवेकर



**करवीर : हॅलो प्रभात**

दिव्यांग युवक-युवतीच्या सर्वांगीण व सामाजिक उन्नतीसाठी समाजाने पाठबळ द्यावे. दिव्यांगाच्या सक्षमीकरणाचे व प्रशिक्षित करण्याचे उपक्रम दिशादर्शक आहेत. असे प्रतिपादन एकलव्य अवॉर्ड , राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेते व राणी चनम्मा विद्यापीठ बेळगांवीचे राघवेंद्र आणवेकर यांनी केले.उचगाव (ता. करवीर) येथील हेल्पर्स संस्था उचगाव येथे मोफत दिव्यांग सक्षमीकरण कौशल्ये विकास प्रशिक्षण शिबीर उद्धाटन प्रसंगी ते बोलत होतें. अध्यक्षस्थानी हेल्पर्सचे उपाध्यक्ष मनोहर देशभ्रतार होते.महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळचे कामगार कल्याण अधिकारी विजय शिगाडे, कामगार कल्याण केंद्र संचालक, संघसेन जगतकर, महिला कल्याण संस्थेचे अध्यक्ष एम एस चौगुला यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मान्यवरांच्या हस्ते ४५ दिवसाचे निवासी मोफत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले तर नवीन बॅचचे हस्ते उदघाटन करण्यात आले.या प्रसंगी ए पी डी संस्था, महिला कल्याण संस्था, युवा ग्रामीण विकास संस्था, हेल्पर्स संस्थेकडून सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाविषयी पालकांनी व प्रशिक्षणार्थीनी कौतुक केले.

## 'शहीद' मध्ये ब्युटीशियन कोर्स सुरू होणं कौतुकास्पद : स्नेहल पाटील



**तिटवे : हॅलो प्रभात**

शहीद महाविद्यालयात सौंदर्य व हेअरस्टाईल क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी 'ब्युटीशियन कोर्स' सुरू होत असल्याचं कौतुक व्यक्त करत सुप्रसिद्ध ब्युटीशियन स्नेहल पाटील म्हणाल्या, ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना सौंदर्यशास्त्रासारख्या कौशल्याधारित क्षेत्रात प्रशिक्षण मिळणं ही खरोखरच आनंदाची बाब आहे.या निमित्ताने महाविद्यालयात एक दिवसीय 'ब्युटी अँड हेअरस्टाईल वर्कशॉप' आयोजित करण्यात आले. कार्यशाळेत स्नेहल पाटील यांनी मेकअपचे विविध प्रकार, त्वचेची योग्य निगा, चेहऱ्याच्या आकारानुसार हेअरकट, तसेच ब्रायडल, पार्टी आणि कॅज्युअल हेअरस्टाईलच्या ट्रेंड्सचे प्रात्यक्षिक दिले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक प्रा. दिग्विजय कुंभार यांनी केले.या कार्यक्रमाला उपप्राचार्य सागर शेटगे, प्रा.अश्विनी खोत, प्रा.हर्षा उणे आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## दुधगांवच्या उपसरपंचपदी अविनाश भोसले

**दुधगाव : हॅलो प्रभात**

दुधगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदासाठी पार पडलेल्या निवडणुकीत मोठा राजकीय बदल झाला.दुधगाव विकास आघाडीचे उमेदवार अविनाश भोसले यांनी १८ पैकी १० मते मिळवत स्पष्ट विजय मिळवला असून, स्वाभिमानी शेतकरी संघटनेला धक्का बसला. एकूण १८ सदस्यांपैकी सर्वांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानापूर्वी दोन्ही गटांनी आपल्या उमेदवारांच्या पाठिंब्यासाठी जोरदार हालचाली केल्या. परंतु स्वाभिमानी गटाचा पराभव करत दुधगाव विकास आघाडीने विजय मिळवला. मागील दोन वर्षांत उपसरपंचपदावर स्वाभिमानी गटाचा दबदबा होता. प्रवीण कोले आणि गिरीश पाटील यांनी अनुक्रमे पद सांभाळले होते. यंदाही स्वाभिमानी गटाचाच उमेदवार जिंकेल अशी अपेक्षा होती. विजयानंतर अविनाश भोसले यांनी ग्रामस्थांचे आभार मानले.

# शरद सहकारी सूतगिरणीच्या चेअरमनपदी बी.एस.देसाई

## व्हा.चेअरमनपदी अशोक फराकटे

**गारगोटी : धनाजी आरडे**

आकुर्डे (ता.भुदरगड) येथील शरद सहकारी सूतगिरणीच्या चेअरमनपदी बाबूराव सर्जेराव देसाई यांची तर व्हाईस चेअरमनपदी अशोक मारुती फराकटे यांची एकमताने निवड करण्यात आली. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शरद सूतगिरणीच्या पहिल्या टप्यात १२ हजार ५०० चात्यांचा प्रकल्प वर्षभरात कार्यान्वित करणार असल्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

सहकारी सूतगिरणीची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली. सोमवारी चेअरमन, व्हा. चेअरमन निवडीसाठी बैठक झाली.




अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी तथा वस्त्रोद्योग विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त श्रीमती उज्वला पळसकर होत्या. चेअरमन पदासाठी बी. एस. देसाई यांचे नाव प्रा. अर्जुन आबिटकर यांनी सुचविले. त्यांना सुभाष चौगले यांनी अनुमोदन दिले. व्हा. चेअरमन अशोक फराकटे यांचे नाव जयवंत चोरगे यांनी सुचविले. त्यांना संजय अनंत पाटील यांनी अनुमोदन दिले.

यावेळी संचालक प्रा. अर्जुन आबिटकर, यशवंत नांदेकर, धैयशील भोसले, अशोक फराकटे, शहाजी देसाई, सुभाष चौगले, अनंत पाटील, संजय पाटील, रंगराव मगदूम, अतुल पाटील, जयवंत चोरगे, रामचंद्र शिऊडकर, दादासो पाटील, उमाजी पाटील, सुनिल जठार, बाळकृष्ण भोपळे, महादेव खोत, उमेश तेली, सौ. वैशाली डवर, सौ. विजया देसाई आदी संचालक उपस्थित होते. सहाय्यक निवडणूक अधिकारी एम. एम. नरुटे, अवधूत परुळेकर यांनी सभेचे नियोजन केले.

# सहशालेय उपक्रमामुळेच विद्यार्थ्यांच्यात वक्तृत्व गुणांची वाढ : मधुभाऊ किरुळकर

**धामोड : हॅलो प्रभात**

वृक्षारोपण ,रक्षाबंधन, गुरु पौर्णिमा, अंधश्रद्धा निर्मूलन ,व्यसनमुक्ती यासारख्या विविध सहशालेय उपक्रमाद्वारे शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यास त्यांच्यामध्ये आपोआपच नेतृत्व,कर्तृत्व व वक्तृत्व गुणाची वाढ होईल असा ठाम विश्वास ग्रा.पं सदस्य व स्व.गोविंदरावजी कलिकते दूध संस्थेचे चेअरमन मधुभाऊ किरुळकर यांनी केले. म्हासुर्ली (ता.राधानगरी) येथील हायस्कूलमध्ये रक्षाबंधनानिमित्त आयोजित, वृक्षारोपण व वृक्षांना राखी बांधून 'रक्षाबंधन' समारंभ प्रसंगी ते प्रमुख



मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बाळासाहेब दुरुगडे होते .राधानगरी तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे संचालक धनाजी कलिकते, व्ही.एस लाड प्रमुख उपस्थित होते. स्वागत एस एस पोवार यांनी केले. औदुंबर पाटील यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थिनी प्रतिनिधी कु आकांक्षा भितम, समृद्धी खुडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्षाना राखी बांधण्यात आली व वृक्ष संरक्षण व संवर्धनाची विद्यार्थ्यांनी शपथ घेतली.

पृथ्वीचा विनाश टाळण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी काळजी घेण्याची गरज असून 'एक मूल एक झाड' ही संकल्पना गावांमध्येच रुजली पाहिजे असे आवाहन मुख्याध्यापक बी आय दुरुगडे यांनी अध्यक्षपदावरून बोलताना दिली. वसंत गुरव, शरद कांबळे ,रामदास वडाम, किरण कवडे, शारदा कांबळे ,मनीषा पाटील, यशवंत रेडेकर ,शिवाजी वडाम,विराज भितम समर्थ अस्वले, मयूर बाचणकर, विनायक वडाम ,महेश जोगम, अंकुश सावंत उपस्थित होते.

## एक रहोगे तो नेक रहोगे : स्वामी स्वदेशानंद ब्रह्मगिरी महाराज




**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

अखंड भारताच्या नवनिर्मितीसाठी आम्ही सर्व संत महंत भारतभर भ्रमण करत असून 'एक राहिलो तरच नेक राहू ' हे ब्रीदवाक्य घेऊन आम्ही हे समाजकार्य करत आहोत. यासाठी सर्व सनातन धर्मियांनी एकत्र येणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय संत बौद्धिक मंचचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष स्वामी स्वदेशानंद ब्रह्मगिरी जी महाराज यांनी केले.पुणे येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे आंतरराष्ट्रीय संत बौद्धिक मंच व नरेंद्र मोदी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय संत संमेलनात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नरेंद्र मोदी विचार मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष रवीजी चाणक्य होते स्वामी स्वदेशानंद महाराज, बालकानंदगिरी महाराज, विनोद नाथजी गिरी महाराज, श्री.श्री. १०८ महंत डॉ जिद्दीनाथ अंघोड पीर( नटेश्वरी परिवार ) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना ब्रह्मगिरी जी महाराज म्हणाले, सध्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगात आपल्या देशाचे स्थान कसे वरचे होईल यासाठी प्रयत्न करत आहेत ही अतिशय चांगली गोष्ट आहे. या संत संमेलनाचे आयोजन नरेंद्र मोदी विचार मंच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यमराज खरात यांनी केले होते. या संमेलनाला देशातील पंजाब,छत्तीसगड,उत्तर प्रदेश,उत्तराखंड,आसाम,तामिळनाडू,मध्य प्रदेश,हिमाचल प्रदेश, दिल्ली,आंध्र प्रदेश अशा २७ राज्यातील संत महंत तसेच नेपाळ येथील महंत उपस्थित होते.

# शिवसेनेचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

**कुरुंदवाड : कुलदीप कुंभार**

गेल्या वर्षभरापासून कुरुंदवाड नगरपालिकेला कायम स्वरूपी मुख्याधिकारी नसल्यामुळे शहराच्या विकासकामांमध्ये अडथळे येत आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख वैभव उगळे यांनी तातडीने अनुभवी आणि पात्र मुख्याधिकारी नेमण्याची मागणी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याकडे केली आहे.

पालिकेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्याने स्वच्छता कामांचा ठेका दिला गेलेला नाही, अनेक



विकासकामे रखडली आहेत आणि निकृष्ट दर्जाची कामे होत आहेत.

प्रभारी मुख्याधिकारी हे मोजकेच दिवस हजर राहत असल्याने महत्त्वाचे प्रशासकीय निर्णय प्रलंबित राहत आहेत, ज्यामुळे प्रशासकीय काम काजात मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळे नागरिकांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध होत नाही आणि नागरी समस्यांचे निराकरण वेळेवर होत नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी दयानंद मालवेकर, भरत घोरपडे,प्रतीक धनवडे, बाळसिंग रजपूत, गणेश चव्हाण, ओंकार बाबर, स्वप्निल चव्हाण, मंगल चव्हाण, वैशाली जुगळे, राजश्री मालवेकर, शशिकला वाडीकर, हसीना जमादार यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## 'विवेकानंद'चे प्रा.विराज जाधव यांची दुहेरी कामगिरी

### अभिनव उपकरणांना भारत सरकारकडून पेटंट मान्यता

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद महाविद्यालयातील बी.बी.ए. व एम.बी.ए. विभागप्रमुख प्रा.विराज विजय जाधव यांनी डिझाईन केलेल्या एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर आणि एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर या उपकरणांना भारत सरकारकडून पेटंट मान्यता मिळाली आहे.एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर-गंभीर रुग्णासाठी हॉस्पिटलमधील व्हेंटिलेटरवर अवलंबून राहणे महागडे व जिकिरीचे ठरते. या पोर्टेबल उपकरणामुळे रुग्णाला घरच्या घरी व्हेंटिलेटरची सुविधा देता येऊ शकते.एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर-वाढत्या प्रदूषणामुळे श्वसनविकार वाढत आहेत. टख (एअर क्वालिटी इंडेक्स) नुसार हवा शुद्ध करणारे हे उपकरण लहान व हलके असल्याने ते सहज सोबत नेता येते. या संशोधन कार्यासाठी प्रा. जाधव यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा सौ.शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ.आर. आर.कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

# भगवान सुतार यांचा ज्ञानदानाचा सोनेरी प्रवास

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

अत्यंत गरीब परिस्थितीत, दुर्गम पासार्डे (ता.करवीर) या गावात २ जुलै १९६७ रोजी जन्मलेले श्री. भगवान ज्ञानू सुतार यांचा जीवनप्रवास आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल असा आहे. आई-वडील मजूरी करून संसाराचा गाडा ओढणारे, अशिक्षित असूनही मुलाच्या शिक्षणासाठी झटले.

यामुळेच मुलगा भगवान यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडवून देश हिताचे काम त्यांच्या हातून झाले आहे. नुकतेच ते सेवानिवृत्त झाले. अनेक मान्यवर पदाधिकारी यांनी भेटून शुभेच्छा दिल्या. गावातील प्राथमिक शाळेत



१ ली ते ६ वी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी सांगरूळ हायस्कूल, सांगरूळ येथे ७ वी ते १० वीचे शिक्षण पूर्ण केले. १० वी नंतर कलानिकेतन, कोल्हापूर येथे ए.टी.डी. (आर्ट टीचर डिप्लोमा) मिळवला तसेच भाई माधवराव बागल विद्यापीठ, शाहूपुरी, कोल्हापूर येथे डी.एड.पदवी संपादन केली.१६ जून १९८९ रोजी श्री.शिवशक्ती विद्यालय, साळुंखेनगर, कोल्हापूर येथे शिक्षक म्हणून ज्ञानदानाची वाटचाल सुरू केली. निवड मंडळाच्या परीक्षेत यश मिळवून डिसेंबर १९९३ मध्ये जिल्हा परिषदेच्या सेवेत प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झाले. गगनबावडा-म्हाळुंगे, वेसर्डे वि.म.परखंदळे पन्हाळा, महे, बीड, हणमंतवाडी आदी ठिकाणी अध्यापन करून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचे दीप प्रज्वलित केले. ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून वि. मं. हणमंतवाडी येथून ३१ जुलै २०२५ रोजी ते सेवामुक्त झाले. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि विद्यार्थ्यांप्रती मायेचा ओलावा यामुळे ते केवळ शिक्षकच नव्हे तर मार्गदर्शक व मित्र म्हणूनही विद्यार्थ्यांच्या मनात घर करून राहिले. या प्रवासात मिळालेल्या चांगल्या मित्रांचे सहकार्य हे लाखमोलाचे ठरले, असे ते भावुक होत सांगतात.

एका लहानशा, गरीबीने वेढलेल्या खेड्यातून सुरू झालेला हा प्रवास सेवामुक्तीच्या दिवशी एक प्रेरणादायी कथा बनून थांबला आहे.

## रेमेडियम लाइफ केअरचे शानदार प्रदर्शन

**मुंबई : हॅलो प्रभात**

देशातील फार्मास्युटिकल पुरवठा साखळी आणि स्पेशालिटी केमिकल्स क्षेत्रात झपाट्याने वाढणारी कंपनी रेमेडियम लाइफकेअर लिमिटेडने ३० जून २०२५ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीसाठी आपले आर्थिक परिणाम जाहीर केले, जे कंपनीच्या कामगिरीत सकारात्मक बदल दर्शवतात. कंपनीने ४६४.८८ लाख रुपयांचा कर पश्चात नफा नोंदवला जो ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या मागील तिमाहीत नोंदवलेल्या २०४.६० लाख रुपयांच्या तोट्याच्या तुलनेत लक्षणीय सुधारणा दर्शवतो.

# माता-भगिनींना योग्य सन्मान मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध : आ.राहुल आवाडे

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

मतदारसंघातील माता-भगिनींना योग्य तो सन्मान मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र असलेले इचलकरंजी मतदारसंघात जितका पुरुष काम करतो तितकीच मेहनत येथील माता-भगिनीही करतात. काळानुरूप यंत्रमाग व्यवसायाबरोबर गारमेंट व्यवसाय देखील प्रगतीपथावर असून इचलकरंजी हे गारमेंट सिटी म्हणून ओळखले जात आहे. म्हणून महिलांनीही पुढाकार घेऊन स्वावलंबी बनावे. त्यासाठी सर्वतोपारी सहकार्य करू अशी ग्वाही आमदार राहुल आवाडे यांनी दिली.

भारतीय जनता पार्टी शहर कार्यालय येथे रविवारी भाऊ-बहिणींचे नाते जपणारा रक्षाबंधन सोहळा उत्साहात




साजरा करण्यात आला. इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील जवळपास ५०० पेक्षाअधिक लाडक्या बहिणींनी माजी मंत्री प्रकाश आवाडे व आमदार राहुल आवाडे यांना राखी बांधली. महिलांची सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी मी सदैव तुमचा भाऊ म्हणून पाठीशी उभा राहीन, अशी ग्वाहीही आमदार आवाडे यांनी दिली.

यावेळी प्रकाश दत्तवाडे, बाळासाहेब कलागते, भाजपा शहर पुर्व मंडल अध्यक्ष श्रीरंग खवरे, पश्चिम मंडल अध्यक्ष शशिकांत मोहिते, नरसिंह पारीक, राजु भाकरे, अश्विनी कुबडगे, रमा फाटक, पुनम जाधव, नजमा शेख, सपना भिसे, अर्चना कुडचे, सीमा कमते, जयश्री शेलार, मंगल सुर्वे, सुवर्णा लाड, नागुबाई लोंढे यांच्यासह महिला तसेच भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालिकेचे फुटपाथ गेले बिल्डरच्या घशात?

## बिल्डर पालिकेचे जावई आहेत का? संतप्त खराडीकरांचा सवाल

**पुणे : सोमनाथ साळुंके**

एकीकडे फुटपाथवर अनधिकृतपणे खोदाई करणाऱ्या ठेकेदारावर पालिकेकडून कारवाईचा बडगा उचलला जात असताना दुसरीकडे याच नियमांना केराची टोपली दाखवली जात आहे. खुलेआमपणे फुटपाथची बांधकाम व्यावसायिकांकडून दुरवस्था करून सुद्धा अशा व्यावसायिकावर पालिकेच्या पदपथ विभागाकडून ठोस पाऊले उचलली जात नसल्याने पालिकेचे फुटपाथ अशा व्यावसायिकांच्या घशात जात असल्याने बिल्डर हे पालिकेचे जावई आहेत का?असा संतप्त सवाल खराडीकराकडून केला जात आहे.

सध्या खराडी परिसरात खाजगी कंपन्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरल्यामुळे आयटी क्षेत्र म्हणून हा भाग नावारूपास आला आहे. नोकरीनिमित्त आलेल्या युवक-युवतींनी या भागातच राहण्यास पसंती दर्शविल्यामुळे या भागाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. आयटी पार्क बरोबरच खाजगी बिल्डरांनी देखील डोके वर काढून टोलेजंग इमारती उभारण्यास सुरू



केल्याचे परिसरात चित्र दिसून येत आहे. तरी पण अनेक बांधकाम व्यावसायिकांकडून पालिकेच्या नियमांची पायमल्ली केली जात असल्याचा धक्कादायक खराडी भागात उघडकीस आला आहे. येथे स्थानिक नागरिकांना समस्येचा पाढा वाचण्याची वेळ येऊ नये. याकरिता पालिकेच्या वतीने बहुतांश प्रमाणात सुखसुविधा पुरविण्यात आल्या आहेत.विशेष करून या भागातून कोट्यवधी रुपयांचा महसूल देखील पालिकेला मिळत आहे.

परिसरात एक नामांकित कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयटीपार्कच्या पाठीमागील बाजूवरील एका बांधकाम व्यावसायिकांचे काम सुरू असून ते पूर्णत्वाच्या मार्गावर



> **संबंधित पालिकेकडून लाखो रुपये जनतेसाठी खर्च करून उभारलेल्या व दुरावस्था झालेल्या फुटपाथच्या कामाबाबत बांधकाम व्यावसायिक दोषी आढळल्यास पालिकेकडून अशा बांधकाम व्यावसायिकास पाठीशी न घालता रीतसर कारवाई करण्यात येईल.**
>
> **●सुशील मोहिते, (अभियंता,मनपा)**

> **पालिकेच्या वतीने लाखो रुपये खर्च करून फुटपाथच्या नुकसानीस जबाबदार असलेल्या बिल्डरवर अन्यथा इतर कोणी दोषी आढळल्यास रीतसर कारवाई करण्यात यावी.अन्यथा जनतेच्या न्यायासाठी मनसे रस्त्यावर उतरेल.**
>
> **●अच्युतराव मोळावडे, (उपसंघटक,मनसे)**

आहे. इमारतीला लागणाऱ्या साहित्यासाठी या ठिकाणी मोठी वाहने येत आहेत. मात्र इमारती जवळूनच पालिकेच्या वतीने पादचारी नागरिकांसाठी लाखो रुपयांचा खर्च करून फुटपाथ बांधण्यात आले आहे . पण येथे येणाऱ्या मोठ्या वाहनांमुळे संबंधित पदपथाची पूर्णपणे वाट लागली असून येथील जमिनीतील राडारोडा हा फुटपाथवर आल्याने पादचारी नागरिकांना फुटपाथवर पडलेल्या राडारोडा व दगडगोटे वर आल्याने येथून पादचारी नागरिकांना रात्री तर सोडाच दिवसाढवळ्या चालणे देखील कठीण होऊन बसले आहे.अनेकदा पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे फुटपाथवर पूर्ण चिखलमय वातावरण होऊन अनेक नागरिक घसरून पडले आहेत. रात्रीच्या सुमारास त्याच्या झालेल्या दुरावस्थेमुळे नाईलाजास्तव पादचारी नागरिकांना मुख्य रस्त्याचा वापर करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे येथे नेहमीच छोट्या मोठ्या अपघाताच्या घटना घडण्याचे प्रकार वाढले आहेत.

विशेष करून याच भागात अनधिकृतपणे फुटपाथची खोदाई करून भूमिगत केबल टाकणाऱ्या ठेकेदारावर पालिकेच्या वतीने दंडात्मक कारवाई करण्यात आली असताना देखील संबंधित पालिकेच्या फुटपाथचे लाखो रुपयांचे नुकसान करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकावर कारवाई करण्यास अधिकारी का?टाळाटाळ करत आहेत. हा मुख्य सवाल उपस्थित होऊन लाखो रुपयांचा महसूल बुडविणारे बिल्डर हे पालिकेचे जावई आहेत का? असा संतप्त सवाल खराडीकराकडून केला जात आहे. इथे काम बिल्डरचे, पण डोक्यावर भार येतो तो सर्वसामान्य जनतेवर येथील फुटपाथची सद्य परिस्थिती पाहून पालिका अधिकारी व संबंधित बांधकाम व्यावसायिक यांच्यात अर्थपूर्ण चर्चा झाली की,काय?अशी शंका स्थानिक नागरिकांकडून करून अधिकाऱ्यांनी अशा बिल्डरसमोर गुडगे टेकले असल्याची कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरिकांकडून शंका उपस्थित केली जात आहे.त्यामुळे पालिकेचा महसूल बुडविणाऱ्या व फुटपाथचे नुकसान करणाऱ्या बिल्डरवर व त्यास पाठीशी घालून कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील रीतसर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## शक्तिपीठ महामार्गामुळे शेतकरी देशोधडीला लागणार



### ऋतुराज पाटील

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शक्तीपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेला असून, हा प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही. शक्तिपीठ महामार्गामुळे शेतकरी देशोधडीला लागणार आहे.पण

शेतकऱ्यांच्या लढ्यासमोर सरकारला झुकावेच लागेल, असा इशारा माजी आमदार ऋतुराज पाटील यांनी दिला. शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्यावतीने कोल्हापूर दक्षिण मतदारसंघातील सांगवडे, सांगवडेवाडी, नेर्ली, कोगील बुद्रुक, कणेरीवाडी, कणेरी, खेबवडे येथे जनजागृती मोहीम राबवण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी महामार्ग रद्द करण्याची मागणी करणारी निवेदने पाटील यांना दिली. शक्तिपीठ महामार्गाची मागणी कोणी केली होती का? जमिनी जाऊन महामार्ग झाला तर चालेल का? असे प्रश्न पाटील यांनी विचारल्यावर शेतकऱ्यांनी एकमुखाने 'शक्तिपीठ नको' अशा घोषणा दिल्या. कोल्हापूरमधील एकूण ५९ गावे या प्रकल्पामुळे बाधित होणार असून, त्यात दक्षिण मतदारसंघातील १० गावे आहेत. सुपीक जमिनी गमावण्याचे हे मोठे संकट असल्याचे त्यांनी सांगितले.

१५ ऑगस्टला शेतात झेंडा लावून 'शक्तीपीठ महामार्गापासून स्वातंत्र्य' असा संदेश द्यावा, असे आवाहन ऋतुराज पाटील यांनी केले. शक्तिपीठ विरोधातील सर्व शेतकऱ्यांचे अर्ज आणि सह्यांच्या मोहिमेतून सरकारचे डोळे उघडतील अशी अपेक्षा व्यक्त केली. हा शेतकऱ्यांच्या न्यायासाठीचा लढा आहे, असे ते म्हणाले.

या जनजागृती मोहिमेत गोकुळ संचालक प्रकाश पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष शशिकांत खोत, विजय पाटील, प्रकाश पाटील, सुदर्शन खोत, तानाजी भोसले युवराज पाटील, निवास ताकमारे, राजू घराळ, सुयोग वाडकर, बबलू वडिंगेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले.

## शिराळा नगरपंचायतीस जुनी तहसील कार्यालयाची इमारत मिळावी

### शिवाजीराव नाईक

**शिराळा :हॅलो प्रभात**



शिराळा नगरपंचायतीसाठी तहसीलदार कार्यालयाची जुनी इमारत मिळवण्यासाठी सर्वपक्षीय जन आंदोलन उभा करणार असा इशारा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक यांनी शिराळा सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत येथे संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार बैठकीत दिला.यावेळी भाजपचे सुखदेव पाटील, विश्वासचे संचालक विश्वास कदम, रणजितसिंह नाईक, शिवसेना शिंदे गटाचे तालुका अध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, प्रा. सम्राट शिंदे,माजी सरपंच देवेंद्र पाटील, उत्तम निकम , अविनाश खोत , वैभव कांबळे आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेश उपाध्यक्ष नाईक म्हणाले की, आम्ही शिराळा नगरपंचायतीस जुनी तहसील कार्यालया व वापरत नसलेली पोलीस ठाण्याची इमारत मिळावी म्हणून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे , जिल्हाधिकारी यांना भेटून लेखी निवेदन दिले होते. शिराळा ग्रामपंचायतीच्या इमारतीतच नगरपंचायतीचा कारभार चालत असून अपुऱ्या जागेमुळे लोकांची गैरसोय होत असून पार्किंगसाठी जागा नसल्यामुळे नगराध्यक्षा पदाधिकारी यांना आपली वाहने घरी ठेवून नगरपंचायत कडे यावे लागते. जुनी तहसीलदार कार्यालय इमारत प्रशस्त व सुस्थितीत आहे. पार्किंग व्यवस्था आहे.विविध विभागासाठी खोल्या आहेत.तसेच सभागृह आहे. याठिकाणी काही तलाठी व मंडळ अधिकारी या इमारतीत विनाकारण ठाण मांडून बसली आहेत यांनी आपल्या सज्जावर जावे. त्यांनी आपल्या कामाच्या ठिकाणी राहून तेथील कार्यालयात काम करावे म्हणजे लोकांना शिराळ्यात कामासाठी हेलपाटे मारावे करणार नाही.

शिराळा नगरपंचायत कार्यालय जुन्या तहसील इमारतीत गेल्यास त्याच्या जवळपास तहसील कार्यालय,नगर भूमापन, पोलिस ठाणे, आय टी आय, सार्वजनिक बांधकाम विभाग, न्यायालय, पंचायत समिती, दुय्यम निबंधक आदी कार्यालये असल्याने नागरिकांची सोय होणार आहे. या इमारतीचे स्थलांतर झाल्यावर जुन्या नगरपंचायत इमारतीत गेली चाळीस वर्षांपासून मागणी असलेल्या पोलीस ठाण्याचे आउटपोस्ट व नगरपंचायतीचे संपर्क कार्यालय केल्यास नागरिकांची सोय होणार आहे. यावेळी प्रा.सम्राट शिंदे, रणजितसिंह नाईक, विश्वास कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

## महाराष्ट्र काँग्रेसमय करा : सतेज पाटील

**पुणे : हॅलो प्रभात**



राज्यात जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुका होत आहेत. या निवडणुका अत्यंत महत्वाच्या असून काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी विषयवार कामाची जबाबदारी घेतली पाहिजे. प्रभाग रचना, गट व गण तसेच मतदार याद्यांचा अभ्यास करा व काही हरकती असतील तर त्या नोंदवल्या पाहिजेत. जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहण्याचा प्रयत्न करा त्यासाठी सोशल मीडिया हे प्रभावी अस्त्र आहे. ७१ टक्के लोक सोशल मीडियाचा वापर करतात, त्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहण्यासाठी सक्रीय रहा, असे आवाहन विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांनी केले आहे.

खडकवासला येथे पदाधिकारी प्रशिक्षण कार्यशाळेत बोलताना सतेज पाटील पुढे म्हणाले की, आपल्या भागातील जनतेचे प्रश्न हाती घेऊन आंदोलने केली पाहिजेत. आठवड्यातून एक तरी आंदोलन झाले पाहिजे. १८ ते २५ वयोगटातील तरुण नवमतदार काँग्रेस सोबत जोडला गेला पाहिजे त्यासाठी त्यांच्यापर्यंत पोहचले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कामाला लागा, आगामी काळात महाराष्ट्र काँग्रेसमय झाला पाहिजे असा संकल्प करा व त्यादृष्टीने वाटचाल करा असे आवाहनही पाटील यांनी केले.

## योगेश पाटील यांचा जनसुराज्य पक्षांत प्रवेश

**मिरज : हॅलो प्रभात**

सेवासदन संस्थेच्या माध्यमातून ३०० हून अधिक लोकांना रोजगार देणारे आणि विविध व्यवसाय चालवणारे सेवासदन आरोग्य समूहाचे संचालक योगेश पाटील यांनी जनसुराज्य युवाशक्तीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष समीतदादा कदम यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह जनसुराज्य पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी बोलताना योगेश पाटील यांनी समितदादा कदम यांच्या नेतृत्वाखाली पक्ष वाढीसाठी आणि समाजसेवेसाठी अविरत कार्यरत राहणार असल्याचे सांगितले.



## श्री सावळसिद्ध सोसायटीच्या अध्यक्षपदी बंडू पाटील; उपाध्यक्षपदी विनायक पवार

**तासगांव : हॅलो प्रभात**

सावळज (ता.तासगाव) येथील श्री सावळसिद्ध विकास सोसायटी, लि.सावळज या संस्थेच्या अध्यक्षपदी बंडू महालिंग पाटील व उपाध्यक्षपदी विनायक तानाजी पवार यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक अधिकारी म्हणून वर्षा पाटील सहकार अधिकारी, तासगाव यांनी कामकाज पाहिले.

श्री सावळसिद्ध विकास सोसायटीच्या अध्यक्ष शिवाजी पाटील व उपाध्यक्ष इंदुताई पोळ यांनी मुदत संपताच राजीनामा दिल्याने नवीन निवडी करता संचालक मंडळाची बैठक बोलावली होती. या बैठकीत नव्या निवडी करण्यात आल्या.अध्यक्षपदी बंडू महालिंग पाटील व उपाध्यक्षपदी विनायक तानाजी पवार यांची बिनविरोध निवड झाली. सध्या संस्थेचे शतकपूर्ती निमित्ताने शताब्दी महोत्सव सुरू आहे. संस्थेचे संस्थापक रामगोंडा पाटील यांचे नातू शिवाजी पाटील यांना शताब्दी महोत्सवात अध्यक्ष होण्याचा मान संस्थेने दिला होता. संस्थेच्या इतिहासातील पहिली महिला उपाध्यक्ष होण्याचा मान मावळत्या उपाध्यक्ष इंदुताई जगन्नाथ पोळ यांना मिळाला होता. पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा ज्येष्ठ सभासदांच्या हस्ते



सत्कार करण्यात आला. सध्या संस्थेचा शताब्दी महोत्सव सुरू असल्याने संस्थेचा यापुढेही नावलौकिक कायम राहावा अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली. यावेळी पॅनल प्रमुख ऋषिकेश बिरणे, मावळते अध्यक्ष शिवाजी पाटील मावळते उपाध्यक्षा इंदुताई पोळ , संचालक प्रदीप माळी,संदीप माळी, प्रशांत कुलकर्णी, विजय पाटील तसेच मोठ्या संख्येने सभासद शेतकरी उपस्थित होते.

## श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा सप्तशतकोत्तर उत्सव सोहळा

**नातेपुते : हॅलो प्रभात**

कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांचे सन २०२५ हे वर्ष सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षपूर्ती तथा ७५० वा जन्मोउत्सव वर्ष असून माऊलींचा जन्म श्रावण कृष्ण अष्टमी,शके ११९७. इ. स. १२७५ रोजी झाला. येत्या गोकुळ अष्टमीला अर्थातच १५ ऑगस्ट रोजी संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर माऊली महाराजांची ७५० वी सप्तशतकोत्तर जन्मोउत्सव आहे. यापार्श्वभूमीवर सन २०२५ हे वर्ष सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त म्हणून साजरा करण्याबाबतचे परिपत्रक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने जारी केले आहे.

या शासन निर्णयाचे समस्त वारकरी संप्रदाय, संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान कमिटीसह वारकरी भाविकांच्या कडून स्वागत करण्यात येत आहे.

या अनुषंगाने येत्या १५ ऑगस्ट रोजी राज्यातील प्रत्येक गाव नगर व शहरांमध्ये महानगरपालिका, तसेच नगरपरिषदा व नगरपंचायती



यांनी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा किंवा मुर्तीची पालखीतून टाळ मृदुंगाच्या जयघोषात मिरवणूक काढून हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्याचा आदेश जारी केला आहे. उपरोक्त नमूद सूचनांची सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्याबाबत योग्य ती दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

## सुसंस्कृत विद्यार्थी म्हणून स्वतःची ओळख निर्माण करा

### प्रा.डॉ.मिलिंद हुजरे

### वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात विद्यार्थी स्वागत समारंभ

**तासगाव : हॅलो प्रभात**

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांना अभिप्रेत असलेला सर्वगुण संपन्न विद्यार्थी घडवणे हेच आमचे ध्येय आहे. पी.डी.व्ही.पी. महाविद्यालयाचा सुसंस्कृत विद्यार्थी म्हणून स्वतःची ओळख निर्माण करा असे उद्गार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अर्थ सहसचिव प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे इयत्ता अकरावी विद्यार्थी स्वागत समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना काढले.

ते पुढे म्हणाले आई-वडिलांचा सन्मान करा.दररोज आई-वडिलांच्या पाया पडून कॉलेजला या तुमचा दिवस उत्साहाने भरलेला जाईल.




ग्रंथालयात जावा चांगली पुस्तके वाचा,मैदानावर जाऊन वेगवेगळे खेळ खेळा. तुमच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयातील विविध उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.विद्यार्थ्यांनी टीव्ही,मोबाईल पासून दूर राहून नियमित अभ्यास करावा आणि आई-वडिलांची स्वप्ने पूर्ण करावीत.महाविद्यालयाची शिस्त सांभाळून महाविद्यालयाचा लौकिक वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत.‌‌माझे विद्यार्थी माझी जबाबदारी‌‌ या भूमिकेतून विद्यार्थ्यांची योग्य काळजी महाविद्यालयात घेतली जाते.सर्व परिसर सीसीटीव्ही च्या निगराणी खाली असून मुलींच्या सुरक्षिततेची खबरदारी घेण्यासाठी निर्भया पथकाने योग्य नियोजन केले आहे.यावेळी कु.आरती जाधव,कु. स्वामिनी बुधावले,कु.मैथिली भस्मे,कु. सुप्रिया घुटूगडे,कु.धनश्री माने, सोहम भिवरे,कु.पायल सुतार या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच प्रा.डी.व्ही.पाटील,विज्ञान विभाग प्रमुख पी.डी.पाटील ज्युनिअर विभाग प्रमुख एस.डी.पाटील यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयाची ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एस.आर.पाटील यांनी केले तर आभार,प्रा.फिरोज वलांडकर यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले. प्रा.अरुणा सुतार यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाला शाळासिद्धी प्रमुख प्रा.डी.एन यादव-पाटील,सीईटी प्रमुख प्रा.आर.डी. पाटील यांसह महाविद्यालयातील सर्व वर्गशिक्षक,प्राध्यापक,इयत्ता अकरावीचे नवोदित विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पाण्याच्या टाकीला श्री शुक्राचार्य महाराज जलकुंभ नाव देण्याची मागणी

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

कोपरगाव शहरात असणाऱ्या साईबाबा कॉर्नर या ठिकाणच्या पाण्याच्या टाकीला परम सदुरू श्री शुक्राचार्य महाराज जलकुंभ असे नाव देण्यात यावे या आशयाचे निवेदन कोपरगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुहास जगताप यांना सोमवार दि ११ ऑगस्ट रोजी शुक्र भक्तांनी देत केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, या विषयाचे निवेदन अगोदरही कोपरगाव नगरपालिकेला देण्यात आले होते त्याच दिलेल्या निवेदनाचा आधार घेऊन या विषयाचा ठरावही काही महिन्यांपूर्वी नगरपालिकेने केलेला आहे,परंतु त्या ठरावाची अंमलबजावणी आज पर्यंत झालेली नाही म्हणूनच आठवण म्हणून



शुक्र भक्तांनी कोपरगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी जगताप यांना निवेदन देत सदर पाण्याच्या टाकिला परम सदुरु श्री शुक्राचार्य महाराज जलकुंभ असे नामकरण पुढील ८ दिवसात द्यावे अशी विनंती वजा मागणी करत जर तसे झाले नाही. तर ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सदर निवेदन देते प्रसंगी सचिन परदेशी, प्रसाद पऱ्हे, आदिनाथ ढाकणे, महेंद्र नाईकवाडे,विशाल राऊत, नितीन चव्हाण उपस्थित होते.

> सदरच्या ण्याच्या टाकीला कलर देण्यात आलेला आहे व त्या टाकीत पाणी सोडलेले आहे त्यामुळे काही ठिकाणी कलरचे पोपडे निघत असल्या कारणामुळे हे काम होऊ शकले नाही परंतु लवकरच कलरची दुरुस्ती करून या पाण्याच्या टाकीला परम सदुरू श्री शुक्राचार्य महाराज जलकुंभ असे नाव देण्यात येईल.
>
> **–सुहास जगताप**
> **नगरपरिषद मुख्याधिकारी**

## ग्रंथालय शास्त्राच्या चाकोरीत डॉ.रंगनाथन यांचा मोलाचा वाटा : कौस्तुभ गावडे



विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ.रंगनाथन जयंती साजरी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे आज अभिवादन कार्यक्रम पार पडला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.यावेळी भाषणात श्री.गावडे म्हणाले, ग्रंथालये साचेबद्ध शास्त्रीय चाकोरीत आणण्याचे श्रेय डॉ. रंगनाथन यांना जाते. वाचन हा समृद्ध जीवनाचा राजमार्ग आहे. विद्यार्थ्यांची पावले नेहमी ग्रंथालयाकडे वळली पाहिजेत, हीच पावले त्यांना यशाकडे घेऊन जातील, असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुंभार होते. स्वागत व प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथपाल श्री.साळुंखे यांनी केले. कार्यक्रमात श्री. साळुंखे, श्री.नारे, श्री.खोत, श्री.जाधव, श्री. इंगळे, सौ.प्रमोदिनी जाधव, सौ.प्रियांका दुर्गुळे, श्री.पानारी यांनी संयोजन केले.यावेळी डॉ.रंगनाथन यांच्या कार्यावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शनही भरविण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे व सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी या उपक्रमास प्रोत्साहन दिले.

## स्वामिनाथन हे विज्ञान, राष्ट्रसेवेचे मुर्तीमंत उदाहरण : डॉ. साताप्पा खरबडे



**राहुरी : हॅलो प्रभात**

डॉ.एम.एस. स्वामिनाथन यांनी केलेल्या संशोधनाचा गाभा अन्नधान्य उत्पादन वाढविणे हाच राहिला. त्यांनी संशोधीत केलेल्या गहू आणि तांदळाच्या उच्च उत्पादक वाणांमुळे देशात अन्नधान्याच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन भारत अन्नधान्यात आत्मनिर्भर झाला. ज्यामुळे देशात हरित क्रांतीचा उदय झाला. डॉ. स्वामिनाथन यांच्या कार्यामुळे केवळ उत्पादन वाढले नाही तर त्यांनी शेतीच्या शाश्वततेवर भर देवून शाश्वत शेती या संकल्पनेचा पुरस्कार केला. डॉ. स्वामिनाथन यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे विज्ञान, राष्ट्रसेवा आणि शेतकर्यांप्रती निष्ठा यांचे मुर्तीमंत उदाहरण असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले.

कृषी क्रांतीचे जनक डॉ. स्वामीनाथन यांच्या जयंतीनिमित्त शाश्वत कृषी दिनाचे आयोजन सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात करण्यात आले होते.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. साताप्पा खरबडे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.डॉ.सुधीर तांबे होते. यावेळी व्यासपीठावर विद्यार्थी कल्याण मंडळाचे डॉ. सुनील भनगे, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही.बी. धुमाळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ, प्रशासकीय अधिकारी प्रा.जी.बी बाचकर, डॉ. व्हि.डी. वाळे आदींसह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर आभार प्रा. जी.बी. बाचकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘संजीवनी’प्रतिष्ठानच्या एक राखी जवानांसाठी उपक्रमाने सैनिक भावूक

**कोपरगांव : विनोद जवरे**

देशभक्ती आणि भाऊ–बहिणीच्या पवित्र नात्याला अभिवादन करत संजीवनी युवा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक विवेकभैय्या कोल्हे यांच्या संकल्पनेतून एक राखी जवानांसाठी या उपक्रमांतर्गत सव्वा लाख राख्यांचा संकल्प घेऊन शिर्डीहून श्रीनगरकडे ऐतिहासिक यात्रेचा केलेला प्रवास अतिशय भावनिक ठरला.जम्मूश्रीनगर येथे सैनिकांसोबत झालेले रक्षाबंधन,आणि प्रत्येक राखी सोबत देशातील विविध राज्यातील बहिणींचे आपुलकीचे संदेश यामुळे सैनिकांना हे रक्षाबंधन भावनिक झाले. रक्षाबंधन सोहळा सुरू असताना अनेक सैनिक भावूक झालेले बघायला मिळाले. सीमावर्ती भागात सुरू असलेल्या ऑपरेशन अखल काळात देखील युवकांच्या या यात्रेने प्रवास करून आम्हाला बहिणींनी दिलेल्या या राख्या सुखरूप सुपूर्द केल्या.यातून अतिशय ऊर्जा मिळाली आहे ज्यामुळे आम्ही शत्रूशी लढताना देश आमच्या प्रत्येक क्षणाला सोबत आहे हे अनुभवायला मिळाले अशी



भावनिक प्रतिक्रिया तेथील सैनिकांनी व्यक्त केली आहे.

जम्मू येथे पोहोचलेल्या संजीवनी युवा सेवकांचे भारतीय सैनिक बांधवांनी उत्साहाने स्वागत केले. रक्षाबंधनाचा पवित्र सोहळा थेट सीमेवर साजरा करताना सैनिकांच्या डोळ्यांत आपुलकीचे अश्रू होते. अनेक सैनिकांनी या प्रसंगी सिंदूर ऑपरेशन दरम्यान राबवलेल्या यशस्वी योजना आणि त्या काळातील थरारक क्षणांची आठवण सांगितली. या संवादात देशसेवेतील त्याग, शौर्य आणि संकटांचा भावनिक पट उलगडला. सैनिकांच्या जीवनात राष्ट्र सुरक्षा करताना त्यांना सण उत्सवाला कुटुंबासमवेत वेळ मिळत नाही यामुळे रक्षाबंधनासारखा महत्त्वाचा सण साजरा करण्यासाठी झालेली ही यात्रा अतिशय कौतुकाची आणि अभिमानाची ठरली.सीमेवर तैनात वीर जवानांना संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे त्यांना देशभरातील बहिणींच्या प्रेमाचा स्पर्श अनुभवता आला. विविध शहरातील बहिणी आणि विद्यार्थिनींनी प्रेमाने तयार केलेल्या राख्या थेट त्यांच्या मनगटावर बांधल्या गेल्या. सैनिकांनी या उपक्रमाचे मन:पूर्वक कौतुक करत, या राख्या आम्हाला नव्या जोमाने देशरक्षणाची ताकद देतात असे सांगितले.

या यात्रेदरम्यान हजारो नागरिकांचे प्रेम मिळालेला राखी रथ हा सैनिकांप्रती राष्ट्र प्रेमाची ऊर्जा वाढवणारा ठरला. युवा सेवक सीमारेषेवर तैनात शूर सैनिकांसाठी प्रेम, आपुलकी आणि कृतज्ञतेचा अमूल्य ठेवा घेऊन रवाना झाले. यंदा या उपक्रमाची व्याप्ती वाढवत, एक लाखाहून अधिक राख्या संकलित करून तब्बल २,२०० किलोमीटरचा प्रवास केला आहे. साईबाबांच्या पावन भूमी शिर्डीहून निघालेला हा राखी रथ सात राज्यातून कोपरगाव, येवला, मनमाड, मालेगाव, धुळे, शिरपूर, सेंधवा, इंदोर, ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, अंबाला, अमृतसर, पठाणकोट, कठूआ,जम्मू, उधमपूर,श्रीनगर असा प्रवास करून सैनिक बांधवांना या राख्या सुपूर्द केल्या.गेल्या पाच वर्षांपासून संजीवनी युवा प्रतिष्ठानची ही अनोखी परंपरा देशभक्ती, भावनिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश दृढ करत आहे. प्रवासादरम्यान शेकडो ठिकाणी रक्षा रथाचे पुष्पवृष्टीने स्वागत झाले असून, ही यात्रा फक्त एक सामाजिक उपक्रम नसून देशाच्या शूर जवानांप्रती प्रेम, सन्मान आणि कृतज्ञतेची एक आदर्श गाथा ठरली आहे

## विद्यार्थ्यांनी लॅब उभी केल्याचा अभिमान : पी.आर.भोसले



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या मेकॅनिकल विभागात प्रोजेक्ट लॅबचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले व सहसचिव एन. आर. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील तिसऱ्या आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रोजेक्टमधून लॅबसाठी आवश्यक असणारी सुमारे दीड लाख रुपयांपेक्षा अधिक किंम तीची उपकरणे उपलब्ध झाली. यामध्ये थ्रीडी प्रिंटर आणि लेझर कटिंग मशीन या दोन अत्याधुनिक यंत्रांचा समावेश आहे. प्रोजेक्ट समन्वयक डॉ. राहुल उरुणकर यांनी प्रास्ताविकात माहिती दिली, तर विभागप्रमुख डॉ. विनायक देवकर यांनी विद्यार्थ्यांच्या काम ावर आधारित दोन संशोधन पेपर आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये सादर होणार असल्याचे सांगितले.चेअरमन पी.आर.भोसले म्हणाले, इंडस्ट्रीसाठी आवश्यक असणाऱ्या लॅब मेकॅनिकल विभागात विद्यार्थ्यांनी उभी केल्याचा अभिमान आहे. अशा अनेक लॅब्स भविष्यात उभाराव्यात. सहसचिव एन. आर. भोसले यांनी देखील मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ.संजीव जैन, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा.एकनाथ साळोखे, डॉ.गजानन कोळी, प्रा.धनंजय पाटील, प्रा.प्रवीण अतिग्रे, प्रा.विकास थोरात, डॉ.अजित काटकर, प्रा.सरदार देशमुख, प्रा. निलोफर खान, रजिस्ट्रार दीपक पाटील, लेखापाल कृष्णात शिंदे, प्रसिद्धी प्रमुख संग्राम पाटील तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## भारतमाता विद्यालयात रक्षाबंधन सण साजरा

**चिकुर्डे : हॅलो प्रभात**

येथील भारतमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वृक्ष माझा भाऊ, निसर्गाचे संवर्धन करूया असा संदेश देत सर्वच मुलींनी झाडाचे औक्षण करत, भली मोठी राखी बांधत राखी पौर्णिमा साजरी केली. रक्षाबंधन म्हणजे भाऊ बहिणीच्या पवित्र नात्याचा सण आहे. सध्याच्या घडीला निसर्गाचं जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे. हाच संदेश देत आमच्या सर्वच मुला मुलींनी झाडाला राखी बांधत वृक्षा बंधनाचा संदेश दिला आहे. प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.बी. सरगर यांनी या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

# महामार्गासह ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था

## खड्ड्यांमुळे मणक्याला दणका ; वाहनांचा खर्चही ३० टक्क्यांनी वाढला

### वरवरची मलमपट्टी पावसाळ्यात उघड

**दौंड : हॅलो प्रभात**

महामार्गासह दौंड तालुक्यातील ग्रामीण भागात पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवाशांच्या मण्यक्यांचे किंवा हाडांचे आजार वाढू लागले आहेत.

वाहने खड्ड्यात आदळत असल्यामुळे दुरुस्ती – सर्व्हिसिंगचा खर्च ३० टक्क्यांनी वाढला आहे. पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग असो, सर्व्हिस रोड असो



किंवा ग्रामीण भागातील रस्ते, सर्वच खड्डेमय झाले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना दररोज जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. खड्ड्यातून जाताना वाहनांचे शॉकप्सर, चाके, सस्पेन्सन, ब्रेक खराब होण्याचे प्रमाण वाढले असल्याने आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. महामार्गावर पडलेले खड्डे असो की ग्रामीण भागातील रस्त्यांवरून दुचाकी वाहन चालवणाऱ्या वाहनचालकांना मान, पाठ, कंबरदुखी शिवाय मणक्यांचे विकार वाढले आहेत. खड्ड्यांमुळे दवाखान्याचा खर्च वाढला आहे.

> **प्रमुख रस्त्यांवर खड्डे, जबाबदारी कुणाची ?**
>
> पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पाटस, वरवंड दरम्यान महामार्गाच्या मधोमध खड्डे पडले असून सर्व्हिस रोडवरील माती पावसामुळे वाहून गेली आहे. त्यामुळे या महामार्गावर खड्डेच खड्डे आहेत. महामार्ग व ग्रामीण भागातील मुख्य व अंतर्गत रस्ते निकृष्ट आहेत. खुटबाव ते पिंपळगाव, खुटबाव ते नाथाचीवाडी हा मुख्य रस्ता खड्डेमय झाला असून रस्ते दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. खड्ड्यांचा साम्राज्यामुळे वाहनाबरोबर शारीरिक आजार वाढले आहेत.

## गौरीशंकर फार्मसीच्या विद्यार्थ्यांची कामगिरी कौतुकास्पद : डॉ.अनिरुद्ध जगताप

**सातारा : हॅलो प्रभात**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष सन २०२४–२५ मधील अंतिम वर्ष बी फार्मसी परीक्षेत गौरीशंकर च्या सातारा कॉलेज ऑफ फार्मसी, देगाव या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेत उत्तुंग कामगिरी केली आहे. महाविद्यालयाचा वार्षिक निकाल ९४.३१% इतका लागला आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा अखंडपणे जोपासली आहे.यामध्ये स्नेहल शिंदे, प्रतीक्षा सोनवलकर, वैष्णवी पांढरे यांनी महाविद्यालय स्तरावर संयुक्तपणे प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. तर वैष्णवी बर्गे,कोमल थोरात यांनीही संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळवला आहे. शिवानी शेंडगे, प्रणाली पवार,संजना जाधव व ओंकार फरांदे या ही विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्याचप्रमाणे श्रावणी काळेल, शुभम गाडे, श्रुती पाटील यांनीही संयुक्तपणे चतुर्थ क्रमांक मिळवला आहे.या गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उत्तुंग यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. अनिरुद्ध जगताप यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा बुके देऊन त्यांचा उचित सत्कार करण्यात आला. यावेळीसंस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर प्राचार्य, डॉ.नागेश अलुरकर, उपप्राचार्य डॉ.योगेश गुरव, डॉ. सीमादेवी कदम, प्रा. अनुराधा साळुंखे, प्रा. वर्षा माने, डॉ अविनाश भोसले, डॉ मनोज शिंदे, प्रा. संध्या बुंदेल, रजिस्टार हेमंत काळे आदी प्रमुख उपस्थित होते. डॉ.अनिरुद्ध जगताप याप्रसंगी म्हणाले की, गौरीशंकरच्या सातारा कॉलेज ऑफ फार्मसी,देगाव महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना सर्वोत्तम ज्ञान देऊन त्यांना घडविले आहे. येथील तज्ञ प्राध्यापकांचे अचूक मार्गदर्शन व विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम अखेर सार्थकी लागले आहे.देगाव महाविद्यालयाने गुणवत्तेची दैदीप्यमान परंपरा कायमच जोपासली आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रा.संध्या बुंदेल यांनी मानले.यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मदनराव जगताप, उपाध्यक्ष मिलिंद जगताप, संचालक जयवंतराव साळुंखे, आप्पा राजगे, प्रशासकीय अधिकारी नितीन मुडलगीकर यांनी केले.

# कोपरगावकर आता बारकोड द्वारे नोंदवू शकतात तक्रारी : मंदार पहाडे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव शहरातील नागरिकांच्या समस्या तात्काळ आणि प्रभावीरीत्या सोडवण्यासाठी माजी नगरसेवक मंदार पहाडे यांच्या संकल्पनेतून प्रयत्नातून एक अभिनव डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार आशुतोष दादा काळे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी दि ४ ऑगस्ट रोजी त्यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत नागरिकांना आता आपल्या नगरपालिका संदर्भातील तक्रारी, अडचणी सूचना केवळ एक ठ कोड स्कॅन केल्यावर संबंधित लिंकवर जाऊन तक्रार नोंदवता येईल. समस्या नोंदणीची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन, सोपी व पारदर्शक असून नागरिकांच्या वेळेचीही बचत होणार आहे. शहरातील विविध भागांत



ठ कोडचे फलक लावण्यात येत असून नागरिकांना मोबाईलच्या सहाय्याने कोड स्कॅन करून तक्रारी नोंदवता येणार आहेत. प्रशासनाकडून या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याचे मंदार पहाडे यांनी सांगितले.

माजी नगरसेवक मंदार पहाडे यांनी सुरू केलेला हा डिजिटल उपक्रम कोपरगाव शहरासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरणार असून नागरिकांच्या सहभागानेच त्याचे यश निश्चित होणार आहे.यावेळी माजी नगरसेवक मंदार पहाडे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या डिजिटल प्रणालीचे सर्व नागरिकांनी स्वागत करत त्यांचे कौतुक केले आहे

> नागरिकांची कामे सोपी करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. वाढदिवस साजरा करताना जनतेच्या सेवेसाठी काहीतरी नवीन आणि उपयुक्त देण्याचा आमचा नेहमी प्रयत्न असतो.
>
> **–आ.आशुतोष काळे**

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,**
**छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या**
**जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976